**K.P.C PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**ASSESSMENT IV - 2023-24**

**GRADE:VII** **MARKS :100**
**SUBJECT: MARATHI** **TIME: 3HRS**

---

**विभाग -अ (गद्य -पद्य) (५४गुण)**

**प्र.१.अ. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा.** (७)

१५, नोव्हेंबर

सगळ्याच विदयार्थ्यांना 'सुगीचे दिवस' प्रत्यक्ष बघायचे असल्यामुळे श्री. पाटीलसर आम्हांला गावशिवारात घेऊन गेले. मोत्यासारखी ज्वारी असलेली कणसं, तुरीच्या शेंगा, भुईमुगाच्या शेंगा आणि कपाशीच्या बोंडांतून डोकावणारा पांढराशुभ्र कापूस बघून मुलं आनंदी झाली.

पेरू, सीताफळ, आवळा, चिंच, बोर ही सर्व झाडं फळांनी लदबदलेली होती. फळं खाण्याच्या तीव्र इच्छेनं मुलं बोरीच्या झाडाला दगडं मारू लागली. दगडांच्या मारानं भरपूर बोरं खाली पडली. सगळ्यांनी पटपट बोरं गोळा करून त्यावर यथेच्छ ताव मारला. आंबट, गोड, तुरट अशा विविध चवींचा आस्वाद घेतला. आम्ही शिवारातून घरी आलो, तरी माझ्या जिभेवर त्या बोरांची चव रेंगाळत होती.

प्र.१) आकृती पूर्ण करा. (२)

शिवारातील चार फळझाडे
→ [ ] → [ ] → [ ] → [ ]

प्र.२)चौकट पूर्ण करा. (२)

१)विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बघायचे होते-

२)जिभेवर चव रेंगाळणारी मुलगी-

प्र.३) श्री पाटील सर मुलांना गाव शिवारात घेऊन गेले कारण ____________कारण लिहा. (१)

प्र.४) शब्दजाल पूर्ण करा. (२)


या सर्व गोष्टी मुलांना शेतात पहायच्या होत्या
→ मोत्यासारखी ज्वारीची कणसे
→ [ ]
→ कपाशीच्या बोंडातून डोकावणारा पांढरा शुभ्र कापूस
→ [ ]

**प्र.१.ब. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा.** (७)

स्त्रियांनी शिकले व शिकवले पाहिजे, त्यासाठी आपल्या मातृभाषेचे अचूक ज्ञान प्राप्त केले पाहिजे. शिक्षिका म्हणून उभ्या राहण्यासाठी स्त्रियांना प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्या दिल्या पाहिजेत, अशी शिफारस त्यांनी हंटर कमिशनकडे केली,अनाथ, अपंग, विधवा अशा स्त्रियांची सेवा करून त्यांना स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी कार्य करण्याचा आपला निश्चय रमाबाईनी पुणे, मुंबई, अहमदाबाद इथल्या पुढाऱ्यांना व धनवानांना

कळवला: पण अशा कार्याची समाजाला काही गरज आहे, हा विचारच काहींना पटला नाही. एका उदार गृहस्थाने दहा हजार रुपये देऊन त्या रकमेत रमाबाईनी त्यांचे चाळीस हजार रुपयांत होणारे काम करून दाखवावे अशी अट घातली.'मला भारतातील सर्व स्त्रिया सारख्याच आहेत. जेथपर्यंत माझ्या शरीरात रक्ताचा एक बिंदुमात्र आहे, तेथपर्यंत आपल्या स्त्री-जातीचे कल्याण व सुधारणा करण्याच्या कामापासून मी परात्मुख होणार नाही

प्र.१) आकृती पूर्ण करा. (२)




प्र.२) एका शब्दात उत्तर लिहा . (२)

१)दहा हजार रुपये यांनी दिले-___________

२) पंडिता रमाबाईंना कोणत्या स्त्रिया सारख्या होत्या_________.

प्र.३) एका वाक्यात उत्तर लिहा. (२)

१)स्त्रियांनी शिकले व शिकवले पाहिजे यासाठी त्यांना काय करणे आवश्यक आहे?


२)एका उदार गृहस्थाने घातलेली अट काय होती?

प्र.४) स्त्री जातीचे ____ व ____ करण्याच्या कामापासून मी परावमुख होणार नाही.(रिकामी जागा भरा) (१)

**प्र.२.अ. खालील कविता वाचून प्रश्नांची उत्तरे कवितेतून शोधून लिहा. (७)**

लेक तांबडं कुंदन, लेक हिरवं गोंदण,
लेक झाडाची पालवी, लेक हाडाचं चंदन,
लेक असता मनाची, सारी काळजी मिटते,
लेक असता घराची, रोज समई पेटते.
लेक नसता घरात, आस लागते उरास,
वेळ जागीच थांबते, आणि मनही उदास.
अशी चिमणी बोलकी, साऱ्या घरात हसते,
थोडे रागावले तर, मग रुसून बसते.
सारे जगही रुसले, तरी पर्वा करू नये,
पण आपली पाकळी, कधी कधी रूसू नये.
फक्त लेकीला कळते, अरे निसर्गाची भाषा,
काळया रात्रीला लागते, कशी सकाळची आशा

प्र.१)आकृती पूर्ण करा. (२)




प्र.२)एका शब्दात उत्तर लिहा. (२)

१)आस इथे लागते-____

२)कवयित्रीचे मन होते-____ (१)

प्र.३)एका वाक्यात उत्तर लिहा.

१)लेक घरी नसताना कवयित्रीची अवस्था कशी होते? (२)

प्र.४)कवितेच्या ओळी पूर्ण करा.

लेक असता मनाची, सारी______________

लेक असता घराची, रोज______________

**प्र.२.ब). खालील कविता वाचून प्रश्नांची उत्तरे कवितेतून शोधून लिहा.** (७)

सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर
त्यांतून काही हळवे हळवे राहत होते स्वर

घरात होता, काना-मात्रा-वेलांटीचा मेळ
एकोप्याने खेळायाचे सगळे अक्षर-खेळ
विरामचिन्हांचीही होती सोबत वरचेवर
सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर

एखादयाची धुसफुससुद्धा हवीहवीशी छान
प्रत्येकाला अर्थ वेगळा सुखदुःखाचे भान
मधले अंतर कुरवाळाया रेघांचे छप्पर
सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर

कानोकानी कुजबुजताना अंकुर मनकोवळा
वाट मोकळी होऊन लागे कवितेचाही लळा
अवतीभवती झिरपत राही गाणे काळीजभर
सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर

प्र.१) चौकट पूर्ण करा. (२)

१)मधले अंतर कुरवाळाया छप्पर → ☐

२)घर कशाचे आहे - ☐

प्र.२)आकृती पूर्ण करा. (२)

१)घरात यांचा मेळ → ☐ ☐ ☐

२)स्वरांचा स्वभाव → ☐

प्र.३)एका वाक्यात उत्तर लिहा. (१)

१)रेघांचे छप्पर कशासाठी पांघरले आहे?

प्र.४) कवितेची ओळ पूर्ण करा. (१)

१)एखाद्याची ______हवीहवीशी _____

प्र.५)यमक जुळणारे शब्द कवितेतून शोधून लिहा.(१)भान -______. (१)

**प्र.३अ.) खालील अपठित गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा.**

शिक्षण म्हणजे आयुष्याला किंवा जीवनाला योग्य दिशा देण्याचे साधन होय. जीवन यशस्वी आणि समाधानी

बनवायचे असेल, तर त्यासाठी शिक्षण हे उत्तम शस्त्र आहे. शिक्षण घेताना नवनवीन माहिती, कला आपल्या अंगीकृत येत असतात.शिक्षण आपल्या जीवनातील एक  मूलभूत घटक आहे. शिक्षण आपले संपूर्ण जीवन अथवा आयुष्य सावरण्यासाठी पुरेसे असते. ज्ञान हे नेहमी ज्ञानी व अज्ञानी या दिशेने वाटचाल करत असते. शिक्षण किंवा ज्ञानाचा कधीच शेवट होत नाही, ज्ञान हे अनंत असते.शिक्षणामुळे आपली इच्छाशक्ती नैसर्गिक रीत्या आणखी प्रबळ होते, सोबतच वैचारिक क्षमता वाढवते. शिक्षणामुळे आपल्याला योग्य आणि अयोग्य यातील अंतर समजते.सोप्प्या शब्दात सांगायचे झाले, तर शिक्षण हा वैयक्तिक, सामाजिक आणि आर्थिक विकासाचा एक मार्ग आहे. विकास हा माहितीवर आधारित आहे आणि माहितीचे मुख्य स्त्रोत शिक्षण आहे.

प्र.१) आकृती पूर्ण करा. (२)

१) ज्ञान हे नेहमी या दिशेने वाटचाल करत असते.

२) माहितीचे मुख्य स्त्रोत →

प्र.२)एका वाक्यात उत्तर लिहा. (२)

१) शिक्षण हा कशाचा मार्ग आहे?

२) शेवट कशाचा होत नाही?

प्र.३) वाक्य पूर्ण करा. (१)

१)विकास हा माहितीवर आधारित आहे आणि__________

प्र.४) एका शब्दात उत्तरे लिहा (१)

१) आपल्या जीवनातील मूलभूत घटक_____

**प्र.३.ब) खालील पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे पद्यातून शोधून लिहा. (६)**

फुलपाखरू !

छान किती दिसते । फुलपाखरू
या वेलीवर । फुलांबरोबर
गोड किती हसते । फुलपाखरू
छान किती दीसते । फुलपाखरू

पंख चिमुकले । निळेजांभळे
हालवुनी झुलते । फुलपाखरू
छान किती दीसते । फुलपाखरू

डोळे बारीक । करिती लुक लुक
गोल मनी जनु ते । फुलपाखरू
छान किती दीसते । फुलपाखरू

मी धरु जाता । येई ना हाता
दुरच ते उड़ते । फुलपाखरू
छान किती दीसते । फुलपाखरू

प्र.१) एका शब्दात उत्तर लिहा. (२)

१) वरील कवितेत कोणाविषयी सांगितले आहे -____

२) फुलपाखरू डोळे  करते-____

प्र.२) एका वाक्यात उत्तर लिहा (१)

१) फुलपाखराचे पंख कसे आहेत?

प्र.३) कवितेच्या ओळी पूर्ण करा (२)

मी धरु जाता । येई ना ____

दुरच ते ____ । फुलपाखरू

____ किती दीसते । ____

प्र.४) खालील शब्दाचे यमक कवितेतून शोधून लिहा (२)

१) उडते -____ २) हाता-____

**प्र.३.क) खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.(कोणतेही ४)** (१२)

१) रोजनिशी का लिहावी रोजनिशी लिहिल्याने काय फायदा होईल असे तुम्हाला वाटते.

२) वैष्णवीचा वाढदिवस कशाप्रकारे साजरा झाला तुमच्या शब्दात स्पष्ट करा

३)पंडिता रमाबाईंनी मुक्तीमिशन मध्ये स्त्रियांसाठी सुरू केलेल्या लहान उद्योगांची नावे लिहा.

४)पंडिता रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये सांगा.

५)पंडिता रमाबाईंना स्त्री जातीविषयी अपार प्रेम होते हे त्यांच्या कोणत्या उद्गारावरून समजते.

## विभाग -ब (व्याकरण) (२४गुण)

**प्र.४.अ) सूचनेनुसार कृती करा.**

**१)अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** (२)

१) <u>कडू</u> कारले मला आवडत नाही

२) हळूहळू रात्र संपली,<u>**पण**</u> आठवणी तशाच होत्या.

**२)खालील वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय व त्याचा प्रकार ओळखा.** (२)

१) माझा हात सतत दुखत होता.

२) त्याने तिकडूनच आवाज दिला.

**३) खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करा** (२)

१) सोनालीने आईला विचारले तुला काय हवे

२) पूर्व पश्चिम उत्तर दक्षिण या चार मुख्य दिशा आहेत

**४) खालील वाक्यातील काळ ओळखा.** (१)

१)शाळेची बस आज उशिरा आली.

**५) समानार्थी शब्द लिहा.** (३)

१) वाट - २) कान- ३) रेघ-

**६) विरुद्धार्थी शब्द लिहा** (२)

१) यश × २) स्वावलंबी ×

**७) वाक्प्रचाराचा अर्थसांगून वाक्यात उपयोग करा.** (४)

१) नोंदी करणे - २) पारा चढणे.

**८) अर्थपूर्ण शब्द तयार करा.(चार शब्द)**.१) बालभारती (२)

**९) खालील शब्द शुद्ध करून लिहा.** १) वात्र्य २) कायक्रम **(२)**

**१०) लिंग बदला.** १) पाहुणी २) मैत्रीण (२)

**११) वचन बदला.** १) कपडे २) मित्र (२)

## विभाग क, (लेखन विभाग) (२२)

**प्र.५.अ) खालील कोणत्याही एका विषयावर निबंध लेखन करा** **(७)**

१) पंडिता रमाबाई एक आदर्श व्यक्तिमत्व

२) यंत्रच नसते तर

**प्र.५.ब) १)पत्रलेखन करा.** (५)

१)आपल्या सोसायटीमध्ये मोफत वाचनालय सुरू करण्याबाबत सोसायटीचे माननीय अध्यक्ष यांना विनंती पत्र लिहा.

**प्र.६.अ) खालील विषयावरून अर्थपूर्ण कथा लिहा व तात्पर्य तुमच्या शब्दात लिहा.** (५)

१) अकबर आणि बिरबल

**प्र.६.ब) खालील विषयावरून आकर्षक जाहिरात तयार करा.** (५)

१) '२६ जानेवारी' निमित्त शाळेमध्ये 'चित्रकला स्पर्धेचे' आयोजन या विषयाची आकर्षक जाहिरात तयार करा.